**<u>नि.दि.दा.क्र. २९/२०१५ मधील नि.क्र. ८४ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरूस्तीसाठी दाखल केलेला आहे. सदरचे अर्जास प्रतिवादी नं. १२ याने म्हणणे देवून विरोध दर्शविलेला आहे.

२. वादीने प्रतिवादी विरूध्द सदरचा दावा वाटपासाठी दाखल केलेला असून प्रतिवादी क्र. १२ यांनी कैफियतीमध्ये वादी व प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित मिळकती दाव्यात समाविष्ट केलेल्या नाहीत असा आक्षेप घेतला आहे. त्यामुळे वाटपाच्या दाव्यामध्ये सदरहू मिळकती व अन्य आवश्यक पक्षकाराना समाविष्ट करण्यासाठी वादीने दुरुस्ती सुचविली आहे. तसेच वादीने दावा कलम २ च्या शेवटी समाविष्ट केलेल्या मिळकतीमधील हिश्श्याबाबत, दाव्याच्या आकारणीबाबत व विनंती कलमामध्ये अनुषंगिक परवानगी मिळणेविषयी विनंती केली आहे.

३. वादीचे म्हणणे प्रमाणे सदरची दुरूस्ती ही फॉर्मल स्वरूपाची असून त्यामुळे मूळ दावेचे स्वरूप बदलत नाही. सदर कामी जादा गुंता निर्माण होवू नये व एकाच दावेमध्ये वादी, प्रतिवादींचे दरम्यानचे वादाचे निराकरण होणेसाठी सदरचा दावा दुरूस्त करणेविषयी विनंती केली आहे.

४. प्रतिवादीच्या कथनानुसार वादीने सदरचा अर्ज प्रतिवादीने हरकत घेतल्यापनंतर सामिल करत आहेत. दाव्याची सुनावणी सुरु झाली असून दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार आहे. सबब, अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे. तसेच अर्ज मंजूर करावयाचा असल्यास वादीवर खर्च बसविण्यात यावा अशी विनंती केली आहे.

५. प्रतिपक्षांच्या परस्पर विरोधी कथनांवरून माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

| <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
| --- | --- |
| १. वादी मागणी केल्यानुसार दुरूस्ती करू शकतो काय ? | होय. |
| २. आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

<u>का र ण मी मां सा</u>

६. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दोन्ही बाजूंचे म्हणणे, कागदपत्रे व एकंदरीत वस्तुस्थिती विचारात घेता सदरचा दावा हा वाटपासाठी दाखल केला असून या दाव्यामध्ये सर्व आवश्यक मिळकती समाविष्ट न केल्यास दाव्यास कायदेशीर बाधा निर्माण होणार आहे. प्रतिवादी क्र. १२ ने घेतलेल्या आक्षेपानुसार वादी दाव्यामध्ये आवश्यक मिळकती सामील करु पहात आहे. वादीने मागितलेल्या दुरूस्तीमुळे दावा मिळकतीमधील वादीच्या व प्रतिवादींच्या हक्काबाबत निराकरण करणे सोईचे होणार असून कोणताही नवीन विषय घुसडला जात नाही. वादीने मागितलेल्या अनुषंगिक दुरुस्तीदेखील क्रमप्राप्त आहेत.

७. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध न्यायनिवाडयानुसार दुरूस्ती मंजूर करण्यामागे दाव्यातील वाद परिणामकारकरित्या सोडवून दावेतील पक्षकारांचे हक्क ठरविणे आवश्यक आहे. वादी मागत असलेल्या दुरूस्तीचा मजकूर पाहिला असता त्याव्दारे मूळ दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होत नाही. उलट सदर दुरूस्तीव्दारे वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असले वादाचे निराकरण एकाच दाव्यामध्ये करणे शक्य होणार असून प्रकरणांची संख्या वाढून गुंता निर्माण होणार नाही.

८. कायदयाच्या प्रस्थापित तत्वानुसार दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दुरूस्ती अर्ज विचारात घेताना दाव्याच्या गुणावगुणांचा विचार करणे जरूरीचे नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ याचा मूळ उद्देश असा आहे की, वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचा मूळ मुद्दा शोधून काढण्यासाठी खरी परिस्थिती अभिलेखावर आणून योग्य व न्याय दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

९. वर नमूद प्रस्थापित तत्व आणि अभिलेखावरील वस्तुस्थिती लक्षात घेता सदरील अर्जामध्ये तथ्य असून सदरची दुरूस्ती ही न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे मूळ दाव्यात बदल होणार नाही अगर स्वरूपही बदलणार नाही. दाव्याच्या सुनावणीचे काम अदयापही सुरू झालेले नाही. सबब, अर्जातील दुरूस्ती करणेस हरकत नाही या निर्णयाप्रत मी आलो आहे. तथापि विलंबाकरीता वादीवर खर्च बसविणे आवश्यक आहे. करिता मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देवून पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने प्रतिवादी क्र. १२ यास खर्चापोटी रक्कम रुपये ३००/— दयावेत व योग्य मुदतीत दावा दुरूस्ती करावी व पुढील पुर्तता करावी.

( सलीम अ. जमादार )
दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,
कणकवली.

दिनांक : २७/०२/२०२०